महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
(A Govt. of Maharashtra Undertaking)
CIN : U40109MH2005SGC153645

दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११
फॅक्स नं. : ०२२-२६५८१०८३
Email : ciro@mahadiscom.in
Website : www.mahadiscom.in

औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
प्लॉट जी - ९, प्रकाशगड, ४ था मजला,
प्रा. अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.

जा. क्र. : औसंवि/ब/ककनिस/५३५१

दिनांक : २३/०२/२०१५

# परिपत्रक

विषय : कर्मचारी कल्याण निधीतून कर्मचाऱ्यांच्या अवलंबिताना वैद्यकीय खर्चापोटी आर्थिक मदत मंजूर करण्याबाबत.

संदर्भ : मेडीक्लेम पॉलिसी परिपत्रक क्र. औसंवि/ब/७३१,दि. ०८/०१/२०१५.

*************

म. रा. वि. मंडळ कर्मचारी कल्याण निधी मार्फत महावितरण/ महापारेषण व महानिर्मिती कंपनीमधील कर्मचाऱ्यांच्या अवलंबिताना काही विशिष्ट आजारांवर वैद्यकीय खर्चासाठी आर्थिक मदत, वैद्यकीय सुविधा, प्रतिपूर्ती मंजूर करण्याची तरतूद आहे.

सद्या म. रा.वि. मं. सुत्रधारी कंपनी मर्यादित अंतर्गत महावितरण, महानिर्मिती व महापारेषण कंपनीतील कर्मचाऱ्यांसाठी तसेच, त्यांच्या कुटूंबातील प्रत्येकी पाच अवलंबित सदस्यांसाठी दि. ०१/०१/२०१५ पासून ते ३१/१२/२०१५ पर्यंत **MSEB HCL Group Mediclaim Insurance Policy** सुरु करण्यात आली असून, त्याबाबत **ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी, पुणे** यांच्याशी करार करण्यात आला आहे.

सबब, म.रा.वि. मंडळ कर्मचारी कल्याण निधीच्या दि. २२/१२/२०१४ रोजी संपन्न झालेल्या ५९ व्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयानुसार सर्व कर्मचाऱ्यांना कळविण्यांत येते की, दि. १ जानेवारी २०१५ पासून महावितरण, महानिर्मिती तसेच महापारेषण कंपनीमधील कर्मचाऱ्यांसाठी मेडीक्लेम योजना सुरु झाली असल्यामुळे तिन्ही कंपनीमधील सर्व कर्मचाऱ्यांनी त्यांच्या अवलंबितांसाठी कर्मचारी कल्याण निधीतून देण्यात येणाऱ्या वैद्यकीय खर्चाची प्रकरणे प्रथम ओरिएंटल इन्शुरन्स कंपनी, पुणे यांच्याकडे मेडीक्लेम अंतर्गत योजनेचा लाभ घेण्यासाठी सादर करावीत. मेडीक्लेम अंतर्गत योजनेचा लाभ न घेता परस्पर कर्मचारी कल्याण निधीकडे प्रकरणे प्राप्त झाल्यास अशा प्रकरणांवर औद्योगिक संबंध विभागाकडून मंजूरीबाबत कोणतीही पुढील कार्यवाही करण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

वरील प्रमाणे परिपत्रकाला जास्तीतजास्त प्रसिध्दी देवून सदर परिपत्रक सर्व कर्मचाऱ्यांच्या निदर्शनास आणून त्याची त्वरित अमंलबजावणी करण्यात यावी. सदर परिपत्रक सर्व कर्मचाऱ्यांच्या माहितीकरीता महावितरण कंपनीच्या **Intranet RAPDRP** या संकेत स्थळावरील **Indistrial Relations Department** यावर देखिल उपलब्ध आहे. सदर परिपत्रकाची मुद्रांकित प्रत (Hard Copy) प्रसारित करण्यात येणार नाही.

(संजय ढोके)
**सदस्य / सचिव, म.रा.वि.मं.क.क.नि.स. तथा**
**मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी (प्रभारी), महावितरण**

प्रति,
सर्व कार्यकारी अभियंता व तत्सम दर्जाचे अधिकारी, महावितरण कंपनी मर्या.

प्रत माहितीसाठी सस्नेह रवाना.

१) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, म. रा. वि.नि.कं. मर्यादित, महानिर्मिती, मुंबई.
२) मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी, म. रा. वि.पा. कं. मर्यादित, महापारेषण, मुंबई
--- यांना विनंती करण्यात येते की, वरील प्रमाणे परिपत्रकाची अंमलबजावणी आपल्या कंपनीमध्ये करण्यांसाठी आवश्यक ती कार्यवाही करावी.

D:\Rajesh 2013\Bhagwat\S.W.F.C. Mediclaim Circular.doc